रिचर्ड बर्ड

उत्तर आणि दक्षिण ध्रुवांचा शोधप्रवासी

लेखिका: हेलन ओल्ड्स

चित्रे: फ्रँक अलोस

रिचर्ड बर्ड

मराठी अनुवादः सुशील मेन्सन

RICHARD E. BYRD

*डिक बर्ड*ने खूप दूरवरून व्हर्जिनियाला आलेले ते पत्र वाचले. न्यायाधीश *कार्सन* यांनी त्याला फिलीपाईन्स बेटांवर येण्याचे आमंत्रण देत होते.

“इथून 10,000 मैलांवर आहे ते,” त्याची आई म्हणाली. “आणि तू फक्त बारा वर्षांचा आहेस.”

पण डिकच्या आईवडिलांनी त्याला पाठवण्याचा निर्णय घेतला. त्याच्या दोन भावांनी त्याच्या प्रवासाची तयारी करण्यास त्याला मदत केली.

“आता तू एक शोधप्रवासी आहेस,” थोरला भाऊ हॅरी म्हणाला.
“सगळं तुझ्या मनासारखं घडतंय,” धाकटा टॉम म्हणाला.

1900 साली अशा दीर्घ प्रवासाला काही आठवडे लागत असत. पण डिकला जहाजातून प्रवास करायला मजा आली. मनिला शहरात त्याचे दिवस मजेत गेले.

लवकरच, त्याची घरी परतण्याची वेळ झाली.

डिकने नकाशा पाहिला. त्याची बोटे हिंदी महासागर आणि सुएझ कालव्यावरून फिरली. मग ती भूमध्यसागर आणि अटलांटिक महासागरावरून फिरली.

“मी या मार्गाने परतू शकतो,” तो मनाशी म्हणाला. “आणि न्यूयॉर्कवरून व्हर्जिनियाला रेल्वेने जाऊ शकतो. म्हणजे, माझी पृथ्वीप्रदक्षिणा होईल.”

उडी मारून तो न्यायाधीश कार्सन यांना आपली कल्पना सांगण्यास धावला.



न्यायाधीश कार्सन यांनी मिनिटभर विचार केला. मग ते म्हणाले, “ठिकाय, मी तुझं घरी जाण्याचं तिकीट त्या हिशोबाने काढतो.”

व्हर्जिनियात पोहोचल्यावर सर्वांनी डिकचे स्वागत केले. तो एखादा प्रसिद्ध शोधप्रवासी असल्यासारखी वागणूक त्याला दिली.

“शोधप्रवास करणं छान आहे,” त्याचे वडील म्हणाले. “पण तू आपलं शिक्षण पूर्ण केलं पाहिजेस.”

डिक शाळेत होता तेव्हा तो फुटबॉल खेळत असे. तो *ॲनापोलिस* शहराच्या नौदल अकादमीत शिकायला गेला तेव्हा तो तेथील फुटबॉल संघात होता.

एका सामन्याच्यावेळी त्याच्या पायाला गंभीर दुखापत झाली. बराच काळ त्याला हॉस्पीटलमध्ये राहावे लागले.

नंतर त्याचे नाविक बनण्याचे प्रशिक्षण सुरू झाले. त्याच्या पायाने त्याला बराच त्रास दिला. त्यामुळे काही वर्षांनंतर, त्याला नौदल सोडावे लागले. नौदलाने त्याला *वॉशिंग्टन डी.सी.* येथे एक नोकरी दिली.

1917 साली अमेरिका आणि जर्मनीदरम्यान युद्ध सुरू झाले. डिकला त्याच्या देशासाठी काहीतरी करावेसे वाटू लागले. त्याने आपल्या तरूण पत्नीशी याबाबत चर्चा केली.

लवकरच, डिक एकट्याने विमान उडवू लागला. “विमान पहिल्यांदा हवेत उडवायची मजा काही औरच असते,” तो मेरीला म्हणाला.

डिकने नौदलाच्या एका विमानाने अटलांटिक महासागर पार करण्याचा विचार केला. तोवर कुणीही असे साहस केले नव्हते. “यामुळे जर्मन सैन्याचेही डोळे दिपून जातील,” डिक म्हणाला.



“पायाच्या समस्येमुळे नौदल मला जहाजावर घेणार नाही. त्यामुळे मी विमान चालवायचे प्रशिक्षण घेईन. विमान उडवायला पायांची गरज नसते.”

पण त्याचवेळी युद्ध समाप्त झाले आणि डिक वॉशिंग्टनला परतला.

तिथे डिक *डिरीजिबल* (हलक्या वायुने भरलेले बिना पंखांचे विमान) विमानसेवेत रुजू झाला. त्या विमानांच्या चालकांनी अटलांटिक महासागरापार डिरीजिबल उडवत नेण्याचे ठरवले. परंतु डिकच्या रेल्वेगाडीला उशीर झाल्यामुळे तो विमानतळावर दोन मिनिटे उशीरा पोहोचला. तोवर डिरीजिबलने उड्डाण केले होते.

त्याच दिवशी दुपारी, डिकने एक बातमी ऐकली. *डिरीजिबल समुद्रात कोसळले. त्यातील सर्व कर्माचाऱ्यांचा मृत्यू झाला.*

“मी नशीबवान होतो, पण या अपघातामुळे मी मागे हटणार नाही,” डिक मेरीला म्हणाला. “हे विमान अटलांटिक महासागर नक्कीच पार करू शकते., असा विश्वास आहे मला. मी हे करून दाखवेन कधीतरी.” पण डिकने काहीकाळ हा विचार स्थगित केला.

त्याने उत्तर ध्रुवावर जाण्याची योजना बनवली. धनाढ्य लोकांनी त्याच्या या मोहिमेला पैशाची मदत केली. नौदलाने त्याला मोहिमेसाठी विमाने दिली.

25 जून 1925 रोजी डिकने दूर अंतरावरील ग्रीनलँडकडे कूच केले. त्याच्या सागरी जहाजाला महाकाय हिमनगांना फोडून मार्ग काढावा लागला. उन्हाळ्याच्या शेवटी शेवटी तो ग्रीनलँडला पोहोचला.

डिकने बर्फाळ उत्तर ध्रुवाबद्दल शक्य तेवढी माहिती गोळा केली. त्याने अनेक तक्ते बनवले, तेथील हवामानाचा अभ्यास केला, तिथे उड्डाण करताना कोणत्या प्रकारचे अन्न आणि कपडालत्ता आवश्यक आहे, याची माहीती घेतली. बर्फावर विमान उतरवण्याचा सरावही त्याने केला.

पुढच्या वर्षी डिक तिथे पुन्हा गेला. त्याच्यासोबत त्याचा नौदलातील मित्र *फ्लॉइड बेनेट*सुद्धा होता. फ्लॉइड हा डिकचा सहवैमानिक होता.

“आपण दोघे उत्तर ध्रुवावर उड्डाण करणारे पहिले मानव असू!” डिक फ्लॉइडला म्हणाला. मग त्यांनी हस्तांदोलन केले.

त्यांनी बर्फात एक धावपट्टी बनवली. पण त्यावरून विमान हवेत उड्डाण करू शकले नाही. हे पाहून डिक चक्रावला. याचे कारण होते, विमानाच्या बर्फावरून सरकत जाणाऱ्या पट्ट्या बर्फाला चिकटून बसल्या होत्या. डिकने पुन्हा पुन्हा उड्डाण करण्याचा प्रयत्न केला. पण तीनवेळा तो अपयशी ठरला. अखेरीस चौथ्या प्रयत्नात विमानाने जमीन सोडली आणि ते हवेत उडाले. हा सराव त्यांना नंतर खूप उपयोगी पडला.

आठवड्याभरानंतर, 9 मे या दिवशी हवामान आल्हाददायक होते. डिकने जोखीम घ्यायची असे ठरवले. “आत्ता नाही तर कधीच नाही,” तो म्हणाला. “आपण उत्तर ध्रुवावरून उड्डाण तरी करू किंवा कोसळून मरू.”

डिक आणि फ्लॉइड विमानात चढले. विमान धावपट्टीवरून धावू लागले. “पूर्ण वेगात धावू दे!” डिकने फ्लॉइडला सांगितले.

मग विमान एखाद्या विशाल पक्ष्यासारखे हवेत झेपावले.

विमान बर्फाळ पर्वतरांगांच्याही वर गेले. दोघा वैमानिकांना त्या पर्वतराजीच्या शिखरांचा विचार करण्यात रस नव्हता. त्यांच्यापैकी एखाद्या शिखरावर विमान चुकून धडकले असते तर त्याचा चक्काचूर झाला असता.

काही वेळाने विमानाचे नियंत्रण डिकने आपल्या हाती घेतले.

“बघ!” अचानक तो ओरडला. त्याने उजव्या इंजिनाकडे बोट दोखवले. त्यातून तेल गळत होते.

आता काय करायचे? थांबायचे आणि दुरुस्ती करायची? कदाचित त्यांना पुन्हा उड्डाण करता आले नसते.

“इथल्या कडाक्याच्या थंडीत आपण जास्त काळ जिवंत राहू शकणार नाही,” डिक म्हणाला.

त्यांनी खिडकीतून खाली दिसणारी बर्फाची पांढरीशुभ्र चादर पाहिली.

“आपण उडत राहू,” डिकने निर्णय घेतला. लवकरच, ते उत्तर ध्रुवावर पोहोचले.

त्यांनी विमान उत्तर ध्रुवावरून मोठ्या वर्तुळाकार मार्गाने फिरवले. त्यांनी तेथील परिसराचे फोटो घेतले तसेच फिल्मसुद्धा बनवल्या.

“यावेळी आपण जगाच्या शिरावर आहोत!” डिक फ्लॉइडला म्हणाला.

मग डिकने विमान पुन्हा ग्रीनलँडकडे वळवले. त्याने विमान धावपट्टीवर अचूक उतरवले. बराच काळ चमकत्या बर्फाकडे बघितल्यामुळे त्यांना भोवळ येऊ लागली. ते खूप थकलेही होते.



लोक या साहसवीरांना भेटायला धावू लागले. लोक त्यांचा जयजयकार करत मोठमोठ्याने ओरडू लागले, “त्यांनी करून दाखवलं, उत्तर ध्रुवावरून विमान उडवून दाखवलं.”



डिक आणि फ्लॉइड न्यूयॉर्कला आल्यावर त्यांचे अभूतपूर्व स्वागत झाले.

उत्तर ध्रुवावरून विमानोड्डाण करणारा पहिला मानव म्हणून डिकला विशेष पदकाने सन्मानित केले गेले.

पण ही तर डिक बर्डच्या शोधप्रवासाची सुरुवात होती. “आता मला अटलांटिक महासागरावरून उड्डाण करायचं आहे,” त्याने जाहीर केले.
त्याने फ्लॉइड बेनेटसोबत योजना आखली.
“मला खात्री आहे,” बेनेट म्हणाला, “एका मोठ्या विमानातून अटलांटिक महासागरावरून विमान उडवणं शक्य आहे. यामुळे अमेरिकेच्या व्यापारातही वाढ होईल. याच्यासाठी आपण तीन इंजिनं असलेलं मोठं विमान वापरू. त्याला *अमेरिका* असं नाव देऊ.”

“मोठ्या विमानाने उड्डाण घेण्यासाठी आपल्याला मोठ्या धावपट्टीची गरज लागेल,” बेनेट म्हणाला.

काही काळानंतर, मोहिमेची तयारी पूर्ण झाली. त्यांच्या मोठ्या विमानाने लाँग आयलंड बेटावरील *रुझवेल्ट* विमानतळावरून उड्डाण केले.

वैमानिक मान हलवत म्हणाला, “विमानाचा पुढचा भाग खूप जड वाटतोय.”

थोड्याच वेळात विमान कोसळले. वैमानिकाने सुरक्षितपणे बाहेर उडी घेऊन जीव वाचवला. पण बर्डच्या हाताला पीळ बसला आणि बेनेटलाही बरीच इजा झाली.

विमानाची नव्याने बांधणी करावी लागली.



पण *अमेरिका* विमान पुन्हा बनण्याआधीच एक दुसरी व्यक्ती अटलांटिक महासागरावरून उड्डाण करण्यात यशस्वी झाली. *चार्ल्स ए लिंडनबर्ग*ने एकट्यानेच न्यूयॉर्क ते पॅरीस असा विमान प्रवास केला. बर्डने त्याला *अमेरिका* विमानाची धावपट्टी वापरायला परवानगी दिली.

29 जून 1927 रोजी बर्ड अमेरिका विमानाचे पुन्हा एकदा उड्डाण करण्यास सज्ज झाला. त्यांनी आपल्यासोबत 800 पौंड वजनाचे टपालही नेले होते. पहिल्यांदाच विमानाने टपाल पाठवण्याचा हा प्रयत्न होता.

अमेरिका विमानाला वाईट हवामानाला तोंड द्यावे लागले. धुके एवढे दाट होते की बर्डला विमानाचा समोरचा भागही दिसत नव्हता.

"आपल्याला अंदाज घेत विमान चालवावं लागणार," त्याने सहकाऱ्यांना कागदावर संदेश लिहून दिला.

या दाट धुक्यातून त्यांनी तब्बल 2,000 मैल अंतर कापले. ते अटलांटिकनजिक पोहोचले तेव्हा सूर्याचे दर्शन झाले. "तो बघा फ्रान्सचा किनारा!" बर्ड ओरडला.

मग त्यांना आणखी दाट धुक्यातून प्रवास करावा लागला. काही वेळाने रात्रीचा काळोख पडू लागला. दाट धुक्यामुळे फ्रेंच विमानतळावर चमकणारे दिवेसुद्धा दिसत नव्हते.

बर्डला अंधारातही विमान उतरवण्याचा आत्मविश्वास होता. पण विमानतळावरील कुणाच्या जीवाशी खेळण्याची त्याची इच्छा नव्हती. विमानात खूप कमी इंधन उरले होते.

बर्डने तात्काळ निर्णय घेतला. “आपण मागे फिरून पाण्यावर विमान उतरवू.”

त्यांचे विमान एक धक्का खाऊन पाण्यावर उतरले. या धक्क्याने दोन सहकारी विमानाच्या बाहेर फेकले गेले. एक सहकारी कसाबसा खिडकीतून बाहेर निसटला.
“डिक, कुठे आहेस तू?’ त्यांनी काळोखातून डिकला हाक दिली.

“मी इथे आहे,” डिक म्हणाला. तो उध्वस्त विमानाला धरून बसला होता.

चौघे एका रबरी नावेवर चढून वल्हवत किनाऱ्याकडे जाऊ लागले.

“बघा, तिथे दिपगृह दिसतंय,” एकजण म्हणाला. दिपगृहाच्या सुरक्षारक्षकाने त्यांना जवळच्या एका फार्महाऊसवर पाठवले. तिथेच त्यांनी रात्र काढली. पण झोपण्यापूर्वी, ते विमान बुडालेल्या जागी गेले आणि विमानातील अमेरिकेचे टपाल काळजीपूर्वक परत मिळवले.

पुढल्या दिवशी ते पॅरीसला गेले. फ्रान्सच्या लोकांनी बर्ड आणि त्याच्या सहकाऱ्यांचा सन्मान केला. महिन्याभरापूर्वी लिंडनबर्गचा केला होता तसाच!

बर्ड न्यूयॉर्कला परतला तेव्हा त्याचे पूर्वीपेक्षाही भव्य स्वागत झाले. पण तो त्यावेळी त्याच्या पुढच्या मोहिमेचा विचार करत होता. त्याची पुढची मोहीम सर्वात रोमांचकारी असणार होती.

तो आता दक्षिण ध्रुवावर विमानोड्डाण करण्याची योजना आखत होता.



अनेक लोकांनी बर्डच्या नव्या साहसी मोहिमेला मदत केली. काहींनी त्याला पैसा दिला. नौदलाने त्याला उपकरणे आणि जहाजे दिली.

बर्डने पैसा उभारण्यासाठी व्याख्याने दिली. त्याने उद्योगपतींना त्यांची उत्पादने देण्याची विनंती केली. “यामुळे तुमच्या उत्पादनांची जाहिरात होईल,” असे त्यांना सांगितले.

आपल्या मोहिमेसाठी लागणारी माणसे त्याने फार काळजीपूर्वक निवडली.

या मोहिमेत *पॉल सिपल* हा स्काउटही सहभागी झाला होता. तो फक्त एकोणीस वर्षांचा होता.

त्यांचे जहाज प्रथम न्यूझीलंडला गेले. मग ते वाटेतील बर्फ फोडत अंटार्क्टिकाला पोहोचले. एकदा तर ते पुढेच जाणार नाही, असे वाटले.

शेवटी ते अंटार्क्टिकाला पोहोचले. “बघा, आपले स्वागत करण्यासाठी हे सारे हजर राहिले आहेत इथे!” पॉल ओरडला. त्याने पेंग्विनकडे बोट दाखवले. तिथे 10,000 पेंन्ग्विन होते. त्यांचे काळे कोट पांढऱ्याशुभ्र बर्फात चमकत होते. पेंग्विन समूहाने या मोहिमवीरांकडे पाहिले.

“अगदी विदूषकांसारखे दिसतायत ते!” पॉल म्हणाला.
“ते तिघे बघा कसे बर्फावरून घसरत चाललेयत!”

“ते कसे जिवंत राहातात, याचा अभ्यास कर,” बर्ड पॉलला म्हणाला. “त्यांच्या वाढीचीही नोंद ठेव. तान्ह्या सील माश्यांच्यासुद्धा अशाच नोंदी कर. पण त्याआधी आपल्याला इतर कामं उरकली पाहिजेत.“

त्यांनी आपली रसद आणि सामान कुत्र्यांकडून खेचल्या जाणाऱ्या गाडीवर लादले. आपल्या शिबीरासाठी त्यांनी एक जागादेखील शोधली.

प्रथम त्यांनी तंबू ठोकले, मग घरे. नंतर त्यांनी घरांना जोडणारी भुयारे बनवली.

त्यांचे शिबीर *रॉस* नावाच्या 20 मैल दूरवर पसरलेल्या अजस्त्र हिमकड्यावर होते. या हिमकड्याची भिंत 100 फूट उंच होती, जवळजवळ दहा मजली इमारतीइतकी उंच! हा हिमकडा अंटार्क्टिकाच्या किनाऱ्याला लागून होता.

“आपण आपल्या शिबिराला *लिटिल अमेरिका* म्हणू,” बर्ड म्हणाला.

लिटिल अमेरिका शिबिरात 41 मोहिमवीर राहिले. ती रात्र तब्बल चार महिन्यांची होती. तापमान बहुतेकदा शून्याच्या बरेच खाली असे.

“हे जगातील सर्वात थंड आणि वेगवान वारे वाहाणारे स्थान आहे,” त्यांच्यातील एकजण म्हणाला.

“आणि सर्वात विरळसुद्धा!” दुसरा म्हणाला.

“अंटार्क्टिका आकाराने ऑस्ट्रेलियापेक्षाही मोठा आहे, पण इथे कुणीच राहात नाही,” तिसरा म्हणाला. “आणि याचा बराचसा भाग अजून अज्ञात आहे.”

“तोच शोधण्यासाठी आपण आलोय इथे,” बर्ड त्यांना म्हणाला.

तिथे त्यांनी *व्हाइटआऊट* परिणामाचा अनुभव घेतला. आभाळ जमिनीवरील शुभ्र बर्फाला प्रतिबिंबित करते. त्यामुळे कोणत्याही वस्तूची सावली दिसत नाही. अगदी क्षितीजाची सीमारेषासुद्धा गायब होते. “आम्ही कुठे उभे आहोत की नाही हेच कळेनासं व्हायचं,” एकजण म्हणाला.

हिवाळा संपला आणि प्रदिर्घ कालावधीचा उन्हाळा सुरू झाला. या काळात सूर्यास्त कधीच होत नसे. उन्हाळ्यातही तापमान शून्याच्या खालीच असे.

बर्ड आणि त्याचे सहकारी संपूर्ण वेळ कामात मग्न असत. त्यांच्याकडे काही तक्ते होते. ते ताऱ्यांचे निरीक्षण करत आणि हवामानाच्या नोंदी ठेवत. त्यांनी वाऱ्याच्या प्रवाहाचा अभ्यास करण्यासाठी हवेत फुगे सोडले. भविष्यात इतर शोधप्रवाशांना उपयुक्त ठरतील असे नकाशे त्यांनी बनवले.

सारा वेळ बर्ड दक्षिण ध्रुवावर उड्डाण करण्याची योजना आखत असे. यापूर्वी कुणीही अशी मोहीम आखली नव्हती.

बर्ड आणि तीन सहकारी या मोहिमेसाठी तयार झाले.

त्यांनी गटातील इतर सहकाऱ्यांशी हात मिळवले. मग चौघे मोहिमवीर विमानात चढले. त्या दिवशी तारीख होती, 28 नोव्हेंबर 1929.

बर्डने आदेश दिला. "खाद्यपदार्थ फेकून द्या!"

त्याच्या सहकाऱ्यांनी 125 पौंड वजनाचे खाद्यपदार्थांचे पोते जाळीच्या दरवाजातून बाहेर फेकले.

काही वेळाने त्यांनी खाद्यपदार्थाचे आणखी एक पोते बाहेर फेकले.



त्यांनी 9,000 फूट उंचीवरून उड्डाण केले. पण लवकरच त्यांना विमान खूप जड असल्याचे जाणवले. वजन कमी करण्यासाठी काय खाली फेकून द्यावे – इंधन की खाद्यपदार्थ?

हलके झाल्यावर विमान वर जाऊ लागले. त्यांनी अगदी थोडक्यात एका पर्वताचे शिखर ओलांडले.

"आम्ही त्या शिखराच्या फक्त एक इंच वर उडत होतो," बर्डने एका कागदावर लिहीले.

मग एक वादळ आले.

एका सहकाऱ्याने नोंद केली, “आपण दक्षिण ध्रुवापासून फक्त अर्धा तास दूर आहोत!”

बर्ड उत्तरला, “तिथे पोहोचायचा कसून प्रयत्न करू.”

काही वेळाने ते दक्षिण ध्रुवावर पोहोचले. बर्डने विमानाची खिडकी उघडली. त्याने अमेरिकेचा झेंडा दक्षिण ध्रुवावर फेकला.

“आम्हाला दक्षिण ध्रुवावर जाऊन-येऊन फक्त अठरा तास झाले आहेत,” विमान *लिटल अमेरिका* शिबिराजवळ परतले तेव्हा एका सहकाऱ्याने नोंद केली.

विमानाने बर्फावर आपले पाय टेकले.

शिबिरातील लोक त्यांच्या घरांमधून बाहेर धावले. त्यांनी बर्ड आणि सहकाऱ्यांना खांद्यावर उचलले.

नंतर बर्डने अंटार्क्टिकाच्या मोठ्या भूभागाचा एक नकाशा बनवला. “या जागेचं नाव *मेरी बर्ड प्रदेश* ठेवू,” असे त्याने ठरवले. पत्नी मेरी आणि त्यांची चार मुले, तीन मुली आणि एक मुलगा, यांचा विचार त्यांच्या मनात आला. ते सगळे अमेरिकेत होते. बर्ड त्यांना गेली दोन वर्षे भेटला नव्हता.

मोहीम संपल्यावर त्यांची घरी जाण्याची वेळ झाली. बर्डने लिटिल अमेरिका शिबिराच्या झेंड्याला सलाम केला आणि त्याला सन्मानाने खाली उतरवले.

त्यांनी सारे सामान पुन्हा कुत्र्यांच्या गाडीवरून जहाजावर आणले.

सर्व 41 माणसे आनंदात होती. जहाजावर सर्व हसत-खिदळत होते.

“परत गेल्यावर छानपैकी बाथटबमध्ये बसून गरम पाण्याने आंघोळ करू,” एकजण ओरडला.

“आपण सर्व मृत्यूच्या तोंडातून परतलोय आणि आता सगळे घरी जात आहोत,” दुसरा म्हणाला.

“आपल्याला दक्षिण ध्रुवाच्या मौहिमेत मोठे यश मिळाले,” बर्ड म्हणाला. “त्यासाठी तुम्हा सर्वांचे खूप खूप आभार!”

घरी परतताना बर्ड आणखी एका अंटार्क्टिक मोहिमेची आखणी करू लागला.

न्यूझीलंडचा किनारा दिसू लागताच, मोहिमवीर ओरडू लागले. “गेल्या कित्येक दिवसात मी साधं झाडसुद्धा पाहिलेलं नाही,” एकजण म्हणाला. “आता मला झाडंसुद्धा विचित्र वाटतायत.”

मग त्यांना श्रवणीय संगीत ऐकू येऊ लागले. बंदरावर एक वाद्यवृंद धुन वाजवत होता “साहसवीर चं स्वागत असो.” लोक मोठमोठ्याने त्यांचा जयजयकार करू लागले आणि झेंडे आणि फलक फडकावू लागले.

बर्डने रेडिओद्वारे जगभरातील लोकांशी संवाद साधला. त्याने दक्षिण ध्रुवावर उड्डाण करताना आलेले अनुभव सांगितले.

वॉशिंग्टनला परतल्यावर, बर्डला *रियर ॲडमिरल* या पदाने सन्मानित करण्यात आले.



1933 साली बर्ड पुन्हा एकदा अंटार्क्टिकावर राहायला गेला. त्याने आपल्या सहकाऱ्यांसोबत शोधप्रवास करून दोन लाख मैल बर्फाळ प्रदेशाचा नकाशा बनवला.

चार वर्षांआधीच्या मोहिमेत टाकून दिलेले खाद्यपदार्थ त्यांनी खाल्ले. ते पदार्थ छान गोठले होते. त्यांनी फक्त ते गरम करून खाल्ले.

“चविष्ट आहे!” ते एकमेकांना म्हणाले.

मग बर्डने सहकाऱ्यांना सांगितले, “मला इथल्या हवामानाची सखोल माहिती गोळा करायचीय. त्यामुळे मी शिबीरापासून एकशेवीस मैल दूर जाऊन एकटा राहीन.”

बर्ड तिथे एकटाच राहिला. त्याच्या सभोवती पांढराशुभ्र बर्फ, आभाळ आणि शांतता होती. तो दिवसभर कामात गुंतलेला असे. दररोज तो दूरपर्यंत फिरायला जात असे. त्याने तेथील हवामानाच्या नोंदी केल्या. त्यामुळे साऱ्या जगाला दक्षिण ध्रवावरच्या हवामानासंबंधी माहिती मिळाली.

एकदा त्याचा स्टोव्ह खराब झाला. मग पोटाच्या विकाराने तो आजारी पडला.

अखेरीस, त्याचे सहकारी तिथे आले आणि त्याला *लिटिल अमेरिका* शिबिरात परत घेऊन गेले. “मी अजून जिवंत आहे!” तो स्वत:शी म्हणाला. खूप छान वाटले त्याला. विमानात बसून वाऱ्यावर स्वार होताना जसे वाटे, तशीच काहीशी भावना झाली त्याची.



त्याने आपल्या नोंदी नियमितपणे आपल्या वहीत लिहिल्या. त्याने पेंग्विनचे निरीक्षण केले. तो दररोज *लिटल अमेरिका* शिबीरातील आपल्या सहकाऱ्यांशी रेडिओद्वारे संवाद साधत असे.

नंतर बर्ड आणखी तीनवेळा अंटार्क्टिकाला गेला. प्रत्येक मोहीम आधीच्या मोहिमेपेक्षा मोठी होती. त्याची शेवटची मोहीम 1956 साली झाली.

त्याने अंटार्क्टिकाचा सुमारे साडेचार लाख वर्ग मैल एवढा भूभाग शोधून त्याचा नकाशा बनवला. आता अंटार्क्टिकामध्ये अमेरिकेचा यापेक्षाही मोठा प्रदेश आहे. बर्डने तेथे अनेक पर्वतराजींचा शोध लावला.

“अंटार्क्टिकाचा शोध हा जणू पश्चिम भूभाग जिंकण्यासारखंच आहे!” असा विचार त्याच्या मनात येत असे.

वसंत ऋतूचे आगमन झाले तेव्हा बर्ड त्याच्या बोस्टनमधील घरी विश्रांती घेत होता. त्या दिवशी हवा झोकात वाहात होती. बर्डला अशी हवा आवडत असे. पण त्याने घरात राहाणेच पसंत केले. तो आता खूप थकला होता.

तो आपल्या मोहिमांचा विचार करू लागला. “मी थोडा आराम करतो,” तो मेरीला म्हणाला. आपल्या उंचपुऱ्या मुलाकडे आणि मुलींकडे पाहून त्याने स्मित केले.
त्याच दिवशी संध्याकाळी त्याचे निधन झाले.



बर्डच्या मृत्यूची खबर दक्षिण ध्रुवावर पोहोचली. तेथील शिबिरातील लोकांना खूप दु:ख झाले. त्यांनी बर्डच्या सन्मानार्थ तेथील झेंडा खाली अर्ध्यावर आणला.

जगभरातील लोकांना बर्डच्या मृत्यूचे वाईट वाटले.

"बर्ड हा महान शोधप्रवासी होता," लोक म्हणू लागले. "त्याच्यामुळे ध्रुवावरचा बर्फाळ प्रदेश सामान्य लोकांसाठी खुला झाला."

समाप्त